

राष्ट्रवादी
काँग्रेस पार्टी
घड्याळ तेच...वेळ नवी..!
प्रभाग क्रमांक ३६ (ड)
सहकारनगर - पद्मावती
कार्य अहवाल
श्री. सुशांत सुनिल ढमढेरे
कार्याध्यक्ष: राष्ट्रवादी युवक काँग्रेस पुणे शहर
संचालक: पुणे अर्बन बँक

जनसेवा हेच कर्तव्य

# पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणुक...

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि भाजपचे उमेदवार यांच्या लढतीच्या निमित्ताने दोन्ही पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. पुण्यातील प्रचार शिगेला पोहोचला असतानाच मी स्वतः मतदारांच्या गाठीभेटी, कार्यकर्ता मेळाव्यांपासून ते स्थानिक नेत्यांच्या गाठीभेटी घेण्यासाठी धावपळ केली. पुणे अर्बन बँकेत बहुतेक कर्मचारी पदवीधर असल्याने पदवीधर मतदार नोंदणी मध्ये सक्रिय सहभाग व त्यांच्या वर विशेष लक्ष ठेवून मतदारांच्या घरापर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न केले. पक्षीय प्रचाराच्या रणधुमाळीत सक्रीय सहभाग घेतला. महाविकास आघाडीचे उमेदवार अरुण आण्णा लाड यांचे चिरंजीव जिल्हा परिषद सदस्य व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष शरदभाऊ लाड प्रचारानिमित्ताने पुण्यात आले असता आमचे मित्र राहूल पोटे यांच्या निवासस्थानी त्यांची सदिच्छा भेट घेतली व त्यांच्यासोबत पदवीधर निवडणुकीबाबत सविस्तर चर्चा केली.पुण्यातील परिस्थिती, पक्षाची बलस्थाने आणि त्याचा होणारा फायदा व महाविकास आघाडीतील घटक पक्षांना सोबत घेऊन जाण्याची गरज या बाबी निदर्शनास आणून दिल्या.

पदवीधर जनतेनेसुद्धा पक्षाबरोबरच आमच्या प्रयत्नाला उचित प्रतिसाद देत आमदार श्री. अरुण आण्णा लाड यांना विक्रमी मतांनी निवडून दिले. पदवीधर निवडणुकीत आण्णांनी पहिल्यांदाच कोटा पद्धत पुर्ण करत बहूमुल्य विजय मिळाविला. या दरम्यान मला महाविकास आघाडीचे उमेदवार अरुण आण्णा लाड यांचा सहवास लाभला. त्यांच्याकडून खूप शिकायला मिळाले. अरुण आण्या लाड यांना निवडून आणण्यासाठी पक्षाने माझ्यावर जी जबाबदारी सोपवली होती, ती मी यथार्थपणे पार पाडू शकलो, याचे समाधान वाटते.






## प्रभागामधील नागरिकांनी सातत्याने केलेल्या मागणीनुसार पी.एम.पी.एल. ची बंद झालेली तळजाई पठार ते पुणे स्टेशन ही बस सेवा चालू करण्यात यश आले.







कार्य अहवाल

जनसेवा हेच कर्तव्य

## प्रभागातील धोकादायक ओवर हेड लाईन एम.एस.ई.बी. च्या सहाय्याने बंद करून नव्याने अंडर ग्राउंड केबल टाकून देण्यात आली






## प्रभागामधील नागरिकांचे बंद असलेले रेशनिंग कार्ड विनामूल्य चालू करून दिले






कार्य अहवाल

## प्रभागातील नागरिकांसाठी नेत्र तपासणी आणि मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते









## प्रभागामधील महिलांसाठी मोफत आरी वर्क प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.









## प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत औषध वाटप व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.









## प्रभागातील नागरिकांसाठी महिला बचत गटाच्या सहाय्याने शॉपिंग फेस्टिवलचे आयोजन करून महिलांना रोजगाराची संधी मिळवून दिली










जनसेवा हेच कर्तव्य

## प्रभागातील नागरिकांसाठी विनामूल्य ७ दिवसीय योग शिबिराचे आयोजन केले .






## प्रभागामधील नटराज सोसायटी येथील खराब रस्त्याचे काम स्वखर्चातून दुरुस्त करून दिले






कार्य अहवाल

# राष्ट्रवादी युवक काँग्रेस पर्वती विधानसभा मतदार संघाचा पदनियुक्ती कार्यक्रम.













राष्ट्रवादी युवक काँग्रेस पर्वती विधानसभा मतदार संघाचा पदनियुक्ती कार्यक्रम.याप्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय श्री.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आपण काम करणार आहोत आपल्या परिसराचा जास्तीत जास्त विकास कसा होईल व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी घरा-घरात कसा पोहचेल याचा प्रयत्न करावा असे आव्हान केले.

जनसेवा हेच कर्तव्य

# उपमुख्यमंत्री आदरणीय श्री. अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भव्य नोकरी महोत्सव














२०० हुन अधिक युवक युवतींना नोकरी उपलब्ध करून दिली.

कार्य अहवाल

# मा. अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जनसन्मान यात्रा









राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरु असलेल्या जनसन्मान यात्रेचे दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी पुण्यात आगमन झाले. पुण्यातील या यात्रेची सुरवात सारसबागेतील श्री गणेशाचे दर्शन घेऊन, त्याचबरोबर अण्णाभाऊ साठे स्मारक, अहिल्यादेवी होळकर स्मारक, सावित्रीबाई फुले स्मारकास पुष्पहार अर्पण करून तसेच दादावाडी येथील जैन मंदिरास भेट देऊन गुरु महाराज यांचे आशीर्वाद घेऊन सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पर्वती विधानसभा मतदार संघाच्या वतीने सारसबाग चौक येथे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी पर्वती विधानसभा मतदारसंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे मनापासून आभार..!




# संकट समयी एकच कर्म, सेवा परमो धर्म...

### -: औषध वाटप :-

संभाजी नगर, यशवंतराव चव्हाण नगर, तळजाई पठार, पद्मावती, सहकारनगर, इत्यादी ठिकाणी कोरोना महामारीच्या काळामध्ये नागरिकांना घरोघरी जाऊन मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

नागरीकांना या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणामध्ये फायदा झाला. जे नागरीक कोरोना काळामध्ये दावा-खान्यामध्ये जाऊ शकत नव्हते अश्या अनेक ज्येष्ठ नागरीकांनी या उपक्रमास प्रचंड प्रतिसाद दिला.






# संकट समयी एकच कर्म, सेवा परमो धर्म...






### -: औषध फवारणी :-

प्रभागामध्ये सर्वत्र विषाणू प्रतिबंधक सोडियम हायपोक्लोराईडची फवारणी करून निर्जंतुकीकरण करून घेतले. सोशल डिस्टंसिंगसह विविध शासकीय नियमाचे पालन व्हावे म्हणून परिसरातील शाळा, कोचिंग क्लासेस चे चालक व पालकांशी संवाद साधला तसेच शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना ऑनलाईन उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले. कोरोनाशी लढा देताना नागरिकांना कोरोनविषयी अद्ययावत माहिती सतत मिळावी यासाठी सोशल मिडियाचा प्रभावी वापर केला. तसेच व्यापारी वर्गाशी संवाद साधून दुकानाबाहेर गर्दी होऊ नये म्हणून प्रयत्न केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वर्धापन दिन...

## जनआरोग्य जागर सप्ताह

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन प्रभागात आरोग्य सप्ताह म्हणून साजरा केला. या माध्यमातून परिसरातील सर्व नागरिकांच्या शुगर, बीपी, टेम्परेचर व पल्सरेट या टेस्ट मोफत केल्या. तसेच भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले, सोशल डिस्टसिंगच्या नियमांचे काटेकोर पालन करत तरुणांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कोरोनाचा कहर आणि भिती प्रत्येकांच्या मनात इतकी जबरदस्त होती की रक्तदानासारख्या पवित्र कार्यास पुढे येण्यास सामाजिक संघटना आणि संस्था सुद्धा धजावत नव्हत्या, नागरिकांच्या मनातील हिच भिती आणि संभ्रम दूर व्हावा आणि गरजवंताना पुरेशा प्रमाणात रक्त पुरवठा व्हावा म्हणून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.










# जनसेवा हेच कर्तव्य...









## -: डॉक्टर पी.पी.ई. किट :-

कोरोना महामारीशी थेट लढणारे घटक महत्त्वाचे असतात. संपूर्ण प्रभागातील सोसायटीचे सुरक्षा रक्षक, रुग्णवाहिका चालक या दुर्लक्षित घटकांना फिल्डशिल्डचे वाटप करण्यात आले. कोरोनाच्या सुरुवातीच्या काळात डॉक्टर्स केवळ मास्क वापरत होते. त्यांना संपूर्ण सुरक्षेसाठी पीपीई किट उपलब्ध होत नव्हते.

साधनसामुग्री शिवाय डॉक्टर हतबल असल्याचे लक्षात येताच मी प्रभागातील डॉक्टरांना स्वखर्चाने पीपीई कीटचे वाटप केले.

# संकट समयी एकच कर्म, सेवा परमो धर्म...

### -: धान्य वाटप :-

'माझे कुटुंब माझी जबाबदारी...'या भूमिकेतून कोरोनाचा फैलाव रोखण्यासमोठी काम करत असताना श्री शिवाजीभाई ढमढेरे चारिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून संभाजीनगर, चव्हाण नगर, तळजाई वसाहत, सहकारनगर, शंकर महाराज वसाहत व राजीव गांधी वसाहत येथील अनेक कुटूंबीयांना धान्य व किराणा वाटप केलं तसेच गरजूंना दररोज ५०० हून अधिक फूड पॅकेट्सचे वाटप केले.






# परिसरामध्ये केलेली काही विकास कामे...










जनसेवा हेच कर्तव्य

# परिसरामध्ये केलेली काही विकास कामे...


















# जनसेवा हेच कर्तव्य

प्रभाग क्रमांक ३६ (ड)

सहकारनगर - पद्मावती

## नमस्कार आदरणीय मतदार बंधु भागिणीनो...

मी आपला सुशांत सुनील ढमढेरे,

सहकारनगर - पद्मावती हा केवळ माझा कार्यभाग नाही, तर माझे कुटुंब आहे. गेल्या ११ वर्षांपासून एक सामान्य कार्यकर्ता म्हणून सुरू झालेला हा प्रवास आज समाजसेवक इथपर्यंत पोहोचला, तो केवळ तुमच्या प्रेमामुळेच!

राजकारण हे सामान्य माणसाच्या समस्यांची सोडवणूक करण्याचे सामर्थ्य असणारे क्षेत्र आहे. लोकांच्या प्रश्नांची, सुख-दु:खांची, भविष्याबाबत दुरदृष्टी ठेवून जाणीव पूर्वक काम करण्याची आवश्यकता असते. विकासाचे व्हिजन मनामध्ये घेऊन मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात पाऊल टाकले आहे. काम करण्याचा केंद्रबिंदू म्हणून शेवटच्या घटकां पर्यंतचा मी प्रामुख्याने विचार करत आलो आहे. आदरणीय अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीला प्रेरीत होऊन मी रात्रंदिवस काम करीत आहे.

संकटकाळात जो धावून येतो तोच आपला, या भावनेतून कोविडच्या कठीण काळात मी घराघरात धान्य, औषधे आणि मोफत लसीकरण पोहोचवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. शासकीय कामांचा त्रास कमी व्हावा म्हणून आपल्या ई-सेवा केंद्राद्वारे हजारो नागरिकांना आधार, रेशनकार्ड आणि दाखले घरबसल्या मिळवून दिले. मग रस्त्यावरचा खड्डा असो किंवा झाडांच्या फांद्या, केवळ एका फोनवर महापालिकेच्या सुविधा तुमच्या दारापर्यंत आणण्याचे व्रत मी गेल्या ११ वर्षांपासून जोपासले आहे.

काही बाबतीत अजूनही सहकारनगर - पद्मावती या भागात बदल घडवण्याची गरज आहे. वाहतूक कोंडीवर पर्याय, सुरळीत पाणीपुरवठा, खड्डेविरहित रस्ते, उत्तम व परवडणारी आरोग्य सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था, महिलांसाठी सुरक्षितता, तरुणांसाठी रोजगारनिर्मिती, ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा अशा अनेक गोष्टींबाबत बदल घडणे आजही गरजेचे आहे. या सर्व व्यवस्था आपल्यासाठी उपलब्ध करून देण्यास मी कायमच प्रयत्नरत राहिलो आहे.

आजपर्यंत सर्वच कामे मी संपूर्ण योगदान देऊन केली. माझ्यामते आपली संस्कृती जपणं ही आपलीच जबाबदारी आहे, त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, आरोग्य शिबीर आयोजित केले. अशा विविध माध्यमांतून आपण भेटलो आहोत... आता एका नवीन जबाबदारीसह आपल्या सेवेत येऊ इच्छितो.

माझ्यासह सर्वांना सार्वजनिक सुखसोयींयुक्त आणि अडचणीमुक्त राहणीमान जगता येईल यासाठी मी कटिबद्ध आहे. यंदाच्या पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत आपण माझ्यासारख्या पारदर्शक आणि सेवाभावी उमेदवाराला संधी द्याल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

आपलाच,

# श्री. सुशांत सुनिल ढमढेरे (MBA)

कार्याध्यक्ष: राष्ट्रवादी युवक काँग्रेस पुणे शहर

संचालक: पुणे अर्बन को-ऑप बँक लि. पुणे.

